मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# लक्ष्मणभाऊंचा अध्यात्मिक वारसा शंकरभाऊंनी जपला!

## पीडब्ल्यूडी मैदान सांगवी येथील अध्यात्मिक सोहळ्याला तुफान गर्दी

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरी- चिंचवड शहराचे लोकनेते लक्ष्मण जगताप यांचा अध्यात्मिक व सामाजिक वारसा त्यांचे बंधू शंकर जगताप यांनी सक्षमपणे जपला आहे. सांगवीतील पीडब्ल्यूडी मैदानावरील विराट गर्दी म्हणजे ''लक्ष्मणभाऊं'च्या माघारी शंकरभाऊंनी जपलेल्या यशस्वी जबाबदारीची पोहोच पावती आहे, अशा भावना श्री अष्टविनायक शिव महापुराण कथा वाचन सोहळ्यात राज्याच्या कानाकोपऱ्यातून सहभागी झालेल्या भाविकांकडून व्यक्त होत आहेत. लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप मित्र परिवार यांच्या वतीने आयोजित श्री अष्टविनायक शिव महापुराण कथेचे आयोजन वतीने पीडब्ल्यूडी मैदान, नवी सांगवी येथे करण्यात आले आहे. या कथेचा आज दुसरा दिवस होता. भाविक आणि शिवभक्तांसह सर्वसामान्य नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी शिव महापुराण आणि त्याचे महात्म विशद करताना आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कथा वाचक पंडित प्रदीप मिश्रा म्हणाले की, 'मनात संशय असताना एखादी गोष्ट करण्याचा प्रयत्न केल्यास अपेक्षित यश मिळत नाही. म्हणून एखादी गोष्ट निशःयपणे केल्यास मिळणारे यश हे सुखावणारे असते. याच प्रमाणे भगवान शंकरावर विश्वास ठेवून त्यांची भक्ती केल्यास निश्चित यश मिळते'. शंकर, पार्वती, कृष्ण ही सर्व परमेश्वाराचीच रुपे आहेत. यांची ध्यानधारणा केल्यानंतर त्याचे पुण्य आपल्याला लाभते. त्यामुळे निस्पृहपणे ध्यानधारणा करावी, असा मोलाचा सल्ला पं. प्रदीप मिश्रा यांनी यावेळी बोलताना दिला. महाराष्ट्रातील सर्वात मोठा शिव महापुराण कथा सोहळा असलेल्या या अध्यात्मिक पर्वातील दुसऱ्या दिवशी देखील या कथेचे श्रवण करण्यासाठी मोठी गर्दी उसळली होती. सुमारे दोन लाख भाविक कथेचा आस्वाद घेताना मंत्रमुग्ध झाले. यावेळी सभामंडपाच्या बाहेर बसून अनेक भाविकांनी कथा ऐकली. वाहतूक पोलीस प्रशासन आणि सुरक्षा व्यवस्था आणि आयोजक कमिटीची दक्षता यामुळे एव्हढ्या प्रचंड प्रमाणात झालेल्या गर्दीतही कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. लाखो भाविक ज्ञानप्राप्ती केल्याचे समाधान घेवून परताताना दिसत होते.




### दरवर्षी सोहळा घेण्याचे आवाहन

» यावर्षी प्रथमच लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप मित्र परिवाराच्या वतीने श्री अष्टविनायक शिव महापुराण कथा सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे. आज पं. प्रदीप मिश्रा यांच्या वतीने भाविकांकडून आलेल्या पत्रांचे वाचन करण्यात आले. यामध्ये भाविकांनी या कार्यक्रमाचे मुख्य निमंत्रक शंकर जगताप यांना 'श्री अष्टविनायक शिव महापुराण कथे'चा सोहळा दरवर्षी घेण्याचे आवाहन केले. पं. प्रदीप मिश्रा यांनी हे पत्र वाचून दाखवितानाच भाविकाने केलेल्या आवाहनाला उपस्थितांनी भरघोस प्रतिसाद दिला. पंडित मिश्रांनी जगताप कुटुंबियांच्या अध्यात्मिक व धार्मिक कार्याचे कौतूक केले.

# पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या शहराध्यक्षपदी : कामठे

## पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या हस्ते तुषार कामठे यांना नियुक्ती पत्र

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाला अखेर शहराध्यक्ष मिळाला असून, बहुप्रतिक्षीत असलेल्या पदावर माजी नगरसेवक तुषार कामठे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी त्यांना नियुक्ती पत्र दिले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे पद रिक्त होते. त्याजागी माजी आमदार विलास लांडे, कामगार नेते अरुण बोऱ्हाडे आणि काशिनाथ जगताप यांच्या नावाची चर्चा होती. मात्र, शरद पवार गटाकडून युवा चेहऱ्याला संधी देण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याकडून त्यांनी नियुक्तीपत्र घेतले. यावेळी आमदार रोहीत पवार, युवक राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष रविकांत वरपे, विद्यार्थी सेलेचे प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे, युवकचे शहराध्यक्ष इम्रान शेख आदी उपस्थित होते. २०१७ मध्ये झालेल्या महापालिका सार्वत्रिक निवडणुकीमध्ये तुषार कामठे यांनी भारतीय जनता पार्टीकडून तिकीट घेतले होते. भाजपाच्या तिकीटावर त्यांनी पिंपळे निलख प्रभागातून निवडणूक जिंकली होती. महापालिकेतील सत्ताकाळात त्यांचे भाजपाच्या स्थानिक नेतृत्वाशी मतभेद होते. त्यामुळे नगरसेवकपदाचा कार्यकाळ संपण्यापूर्वीच महाविकास आघाडी सत्ताकाळातील तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. दरम्यान, अजित पवार यांनी भाजपा- शिवसेना युती सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे राष्ट्रवादीत दोन गट पडले होते. राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी अजित पवार यांच्यासोबत राहण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे शरद पवार गटाचे शहराध्यक्षपद रिक्त होते. तुषार कामठे यांनी शहराध्यक्षपदी जबाबदारी स्वीकारली असून, आगामी काळात भाजपाचे शहराध्यक्ष शंकर जगताप, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्याविरोधात कामठे मोहीम उघडणार आहेत, असे चित्र आहे.



### भाजपाच्या स्थानिक नेतृत्वाशी मतभेद

» २०१७ मध्ये झालेल्या महापालिका सार्वत्रिक निवडणुकीमध्ये तुषार कामठे यांनी भारतीय जनता पार्टीकडून तिकीट घेतले होते. भाजपाच्या तिकीटावर त्यांनी पिंपळे निलख प्रभागातून निवडणूक जिंकली होती. पालिकेतील सत्ताकाळात त्यांचे भाजपाच्या स्थानिक नेतृत्वाशी मतभेद होते. त्यामुळे नगरसेवकपदाचा कार्यकाळ संपण्यापूर्वीच महाविकास आघाडी सत्ताकाळातील तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रवादीत प्रवेश केला होता.

# ठेका धरायला लावणारे नृत्य 'यिन' कला महोत्सव!

## विविध कलाविष्काराला विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

जोशपूर्ण लोकनृत्य, ठेका धरायला लावणारे नृत्य, शास्त्रीय नृत्याचा पदन्यास, सूरमयी सुगम-शास्त्रीय गायन, सामाजिक भाष्य करणारे व्यंगचित्र आणि विविध विषयांवरील वक्तृत्व अशा विविधांगी कलेच्या तुफानाला शनिवारी (ता. १६) उधाण आले. तरुणाईच्या कलाविष्काराने रंगलेल्या 'सकाळ यिन' राज्यस्तरीय कला महोत्सवात तरुणाईचा उत्साह भरभरून वाहिला. शहरासह ग्रामीण भागातील महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने कला महोत्सवात सहभाग घेतला. आकुर्डी येथील पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या महाविद्यालयांमध्ये सकाळ माध्यम समूहाच्या 'यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क'च्या (यिन) कला महोत्सवास सुरवात झाली. पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे कार्यकारी संचालक डॉ.



गिरीश देसाई, देविदास तांबे, रजिस्ट्रार योगेश भावसार यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी एस. बी. पाटील स्कूलच्या संचालक कीर्ती धारवाडकर, एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अॅण्ड डिझाइनचे प्राचार्य डॉ. महेंद्र सोनवणे, 'सकाळ'च्या पिंपरी विभागीय कार्यालयाचे सहयोगी संपादक जयंत जाधव, सकाळ यिनचे प्रमुख श्याम माडेवार आदी उपस्थित होते.

या महोत्सवाची सुरवात समूह नृत्य आणि एकल नृत्य स्पर्धांनी झाली. सुरवातीला पाश्चिमात्य नृत्ये सादर झाली. त्यानंतर लोकनृत्यांना प्रारंभ होताच पारंपरिक वाद्यांच्या तालावर तरुणाईला थिरकायला भाग पाडले. एकल गायन स्पर्धेत एकापेक्षा एक सादर केलेल्या गीतांनी मंत्रमुग्ध केले. त्यामध्ये शास्त्रीय, सुगम, चित्रपटगीतांमधून कर्णमधुर सूर उमटले. सामाजिक विषयांवर भाष्य करताना वक्तृत्व स्पर्धाही या विद्यार्थ्यांनी गाजवली.

या वेळी एकल गायन, जोडी गायन, नृत्य, समूहनृत्य, समूह गायन अशा स्पर्धांमध्ये विद्यार्थी दंग झाले होते. दरम्यान, तरुणाईच्या उदंड प्रतिसादात सुरू असलेल्या यिन कला महोत्सवाचा सोमवारी समारोप होणार असून दुपारी तीनला बक्षीस वितरण समारंभ होईल.

> "यिन कला महोत्सव म्हणजे तरुणाईचा उत्साह, जल्लोष व कलागुणांना वाव देण्याचे हक्काचे व्यासपीठ. तरुणाईला साद घालत सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम 'यिन'तर्फे केले जात आहे. हे काम निश्चितच उत्कृष्ट असून, त्यात तरुणाईचा सळसळत्या उत्साहात सहभाग दिसून येत आहे."
>
> **- डॉ. गिरीश देसाई,** कार्यकारी संचालक, पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट

> "तरुणाईला दिशा देण्याचे काम 'यिन'तर्फे केले जात आहे. वैविध्यपूर्ण सामाजिक उपक्रमात तरुणाईही हिरिरीने सहभागी होत आहे. आता याच तरुणाईला कलाविष्कार सादर करण्याची संधी मिळत आहे. त्यात ते सहभागी होऊन सुप्त कलागुणांना महोत्सवात चालना मिळाली."
>
> **- अक्षता जानकर,** कॉलेज यिन उपाध्यक्ष, मराठवाडा मित्र मंडळ, कॉलेज ऑफ फार्मसी, थेरगाव

> "महोत्सवाच्या निमित्ताने युवक-युवतींच्या कला गुणांना प्रोत्साहन मिळाले. विविध महाविद्यालयांतील तरुणाई एकत्र असल्याने मनोरंजनासह वैचारिक देवाण-घेवाण झाली. विद्यार्थ्यांना व्यक्त होण्याची नवी संधी मिळाली आहे."
>
> **- शिवम तोरणेकर,** यिन सदस्य, रसिकलाल एम. धारिवाल कॉलेज ऑफ फार्मसी, चिंचवड

# पुणे ते केदारनाथ १९०० किलोमीटरचा सायकल प्रवास

## 'मेरी माठी मेरा देश' आणि 'भगवान की खोज' असा अनोखा सामाजिक संदेश

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

श्रावण महिन्यानिमित्त पुण्यातील तीन युवकांनी पुणे ते केदारनाथ असा १९०० किलोमीटरचा सायकल प्रवास पूर्ण केला. पुण्याच्या चिंबळी गावातील सुपुत्र श्री स्वप्नील भुमकर तसेच देहु गावातील श्री रमेश खाडे आणि तळेगाव मावळ मधील श्री राघवेंद्र बेनाडे यांनी श्री संत तुकाराम महाराज मंदिर देहुगाव पासुन सुरू करत थेट उत्तराखंड केदारनाथ मंदिर येथे सुमारे ४४ किलोमीटर सायकल सोबत घेऊन पायी ट्रक करत श्रावण महिन्यातील शेवटच्या दिवशी 'मेरी माठी मेरा देश' आणि 'भगवान की खोज' असा अनोखा सामाजिक




संदेश देत पुर्ण केला. या सायकल प्रवासाबाबत माहिती देताना ते म्हणाले की, या प्रवसात आम्हला कोणतीही अडचण आली नाही. संपूर्ण प्रवासादरम्यान विविध ठिकाणी आमचे स्वागत झाले. स्थानिक नागरिकांनी उत्साहाने आमच्या मोहिमेबाबत चौकशी केली.

या अगोदर स्वप्नील भुमकर यांनी दोन वेळा दक्षिण दिग्विजय पुणे ते कन्याकुमारी, पुणे ते वाघा बॉर्डर पंजाब तसेच पुणे ते कछ बार्डर गुजरात असे मोठमोठे सायकल प्रवास सामाजिक संदेश देत आजपर्यंत ३२,००० किलोमीटर सायकलवर यशस्वीरीत्या पुर्ण केले आहेत. राघवेंद्र बेनाडे यांनी देखील दक्षिण दिग्विजय पुणे ते कन्याकुमारी, पुणे ते वाघा बॉर्डर पंजाब तसेच पुणे ते कछ बार्डर गुजरात असे मोठमोठे सायकल प्रवास सामाजिक संदेश देत आजपर्यंत २०,००० किलोमीटर सायकलवर पुर्ण केले आहेत. रमेश खाडे यांनी देखील दक्षिण दिग्विजय पुणे ते कन्याकुमारी, पुणे ते हम्पी असे मोठमोठे सायकल प्रवास सामाजिक संदेश देत आजपर्यंत २७,००० किलोमीटर सायकलवर पुर्ण केले आहेत. वर्षातून एक तरी मोठी सायकल राईड करायचा आमचा मानस असतो त्या प्रकारे आम्हाला कुटुंबातून देखील पाठिंबा मिळतो.

### आयएएस व विविध ग्रुपचे सहकार्य..

» आजपर्यंतच्या देशभरातील राईटच्या वेळी या सायकलस्वारांना इंडो अॅथलेटिक्स सोसायटी चे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्याचप्रमाणे स्कोडा फोक्सवॅगन, मोशी, पुरंदर, मावळ अशा विविध सायकलिस्ट ग्रुप यांचे सहकार्य लाभले. देहू येथील संत तुकाराम गाथा मंदिर येथून प्रस्थान केले. त्यावेळी मोशी वि.वि.का सोसायटीचे चेअरमन राहुलजी सस्ते, इंडो अथलेटिक सोसायटीचे गणेश भुजबळ, अजित पाटील, अर्णव बिल्डर्सचे तुषार सस्ते, मोशी सायकलिस्टचे अध्यक्ष नितीन घिगे (दाजी), अॅड. प्रशांत सस्ते, विशाल टेकाळे, दया सस्ते तसेच स्कोडा फोक्सवॅगन कंपनीतील अधिकारी अविनाश गोसावी, देहूगाव, मोशी, चिंबळी येथील ग्रामस्थ,राजकीय, वारकरी संप्रदयातील मान्यवर उपस्थित होते.

# गणेशोत्सवाच्या काळात ४०० फिरती स्वच्छतागृहे!

## महापालिका प्रशासनाकडून ५० फिरत्या हौदांची सुविधा

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** आगामी गणेशोत्सवासाठी महापालिका प्रशासनाकडून सुरू करण्यात आलेली तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. विसर्जन व्यवस्था, मूर्तीसंकलन केंद्र, विसर्जन ठिकाणी जीवरक्षकांची नियुक्ती, स्वच्छतागृहांची उपलब्धता आदींबाबत महापालिका प्रशासनाकडून नियोजन करण्यात आले आहे. उत्सवाच्या कालावधीत ४०० फिरती स्वच्छतागृहे आणि १५० फिरत्या हौदांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. उत्सवाच्या कालावधीत शहराच्या विविध भागांत ४०० फिरत्या स्वच्छतागृहांची सुविधा देण्याचे नियोजित आहे. तसेच शहरातील १ हजार १८३ सार्वजनिक स्वच्छतागृहांची माहिती टॉयलेटसेवा ॲपमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. टॉयलेट सेवा ॲपमध्ये पत्ता टाकून त्या भागातील स्वच्छतागृहे शोधता येणार आहेत. तसेच सशुल्क सार्वजनिक स्वच्छतागृहांमध्ये क्यू-आर कोडची सुविधाही देण्यात येणार आहे. यंदा विसर्जनासाठी ४२ बांधीव हौद, २६५ ठिकाणी ५६८ लोखंडी टाक्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. शहरातील १५ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत २५२ ठिकाणी गणेशमूर्ती संकलन केंद्र आणि दान केंद्र उभारण्यास सुरुवात झाली आहे. कृत्रिम हौद, लोखंडी टाक्यांच्या ठिकाणी २५६ निर्माल्य कलशांची व्यवस्था केली जाणार आहे. सर्व क्षेत्रीय कार्यालयांमार्फत संकलित केलेल्या गणेश मूर्तींचे विसर्जन वाघोली येथील खाणीमध्ये करण्यात येणार आहे. त्यासाठी तीन पाळ्यांमध्ये आवश्यक सेवक आणि पर्यवेक्षीय अधिकारी घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून नेमण्यात आले आहेत. उत्सवाच्या काळात सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखण्यासाठी रस्ते, मोकळ्या जागा, कचरा टाकण्याच्या जागा, नदीपात्र, नदीघाट, विसर्जन हौदांची ठिकाणे, सार्वजनिक गणेश मंडळांचे परिसर स्वच्छ ठेवण्याचे आदेश क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आले आहेत. वाघोली येथील खाणीच्या ठिकाणी जीवरक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून क्षेत्रीय कार्यालयाच्या मागणीनुसार गाड्यांची उपलब्धता मोटार वाहन विभागाकडून केली जाणार आहे. मुठा नदी पात्रालगत असणाऱ्या विसर्जन घाटांवर नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी अग्निशमन दलाकडील प्रत्येकी एक फायरमन दुपारी एक ते रात्री नऊ या वेळेत आणि प्रत्येकी दोन जीवरक्षक तीन पाळ्यांमध्ये नियुक्त करण्यात आले आहेत. या कर्मचाऱ्यांच्या नियंत्रणासाठी घाटांवर अग्निशमन अधिकाऱ्यांचीही नियुक्ती करण्यात आली आहे.




### रिसर स्वच्छ ठेवण्याचे आदेश

» सर्व क्षेत्रीय कार्यालयांमार्फत संकलित केलेल्या गणेश मूर्तींचे विसर्जन वाघोली येथील खाणीमध्ये करण्यात येणार आहे. त्यासाठी तीन पाळ्यांमध्ये आवश्यक सेवक आणि पर्यवेक्षीय अधिकारी घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून नेमण्यात आले आहेत. उत्सवाच्या काळात सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखण्यासाठी रस्ते, मोकळ्या जागा, कचरा टाकण्याच्या जागा, नदीपात्र, नदीघाट, विसर्जन हौदांची ठिकाणे, सार्वजनिक गणेश मंडळांचे परिसर स्वच्छ ठेवण्याचे आदेश क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आले आहेत. वाघोली येथील खाणीच्या ठिकाणी जीवरक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून क्षेत्रीय कार्यालयाच्या मागणीनुसार गाड्यांची उपलब्धता मोटार वाहन विभागाकडून केली जाणार आहे.

# अक्षय्य ऊर्जा अभियानात साखर उद्योग आपला ठसा उमटवेल!

## खासदार शरद पवार यांचे प्रतिपादन; पुण्यात एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** साखर उद्योग हा भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मजबूत कणा असून ग्रामीण जनतेच्या सामाजिक आणि आर्थिक उन्नतीमध्ये त्याने महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. इथेनॉल, बायो-सीएनजी आणि हायड्रोजन हे भारताच्या अक्षय्य ऊर्जा कार्यक्रमातील नवीन क्षीतिजे असून त्यांचा वापर करण्याची उपजत क्षमता साखर उद्योगात आहे. त्यामुळे भारताच्या अक्षय ऊर्जा अभियानाला गती देऊन सक्षम ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या उभारणीत साखर उद्योग आपला ठसा उमटवेल, असा विश्वास कोजनरेशन असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष, ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांनी व्यक्त केला. कोजनरेशन असोसिएशन ऑफ इंडियातर्फे आयोजित 'साखर कारखाना संकुलांच्या हरित आणि अक्षय्य उर्जे साठी एकात्मिक धोरण' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन आणि राष्ट्रीय कोजनरेशन पुरस्कारांचे वितरण शरद पवार यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर कोजनरेशन असोसिएशन ऑफ इंडियाचे महासंचालक संजय खताळ, दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष के. पी. पाटील, पी.आर. पाटील, ऑइल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन लिमिटेडचे माजी चेअरमन आणि कार्यकारी संचालक सुभाष कुमार, बायोमासचे सहसचिव डी. डी. जगदाळे, शरद पवार, कोजन इंडियाचे उपाध्यक्ष जयप्रकाश दांडेगावकर, नॅशनल शुगर इन्स्टिट्यूटचे संचालक नरेंद्र मोहन, विस्मा अर्थात वेस्ट इंडियन शुगर मिल असोसिएशनचे अध्यक्ष व्ही.व्ही. ठोंबरे,हायड्रोजन असोसिएशन ऑफ इंडियाचे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि इंडियन ऑईल कॉर्पोरेशनच्या संशोधन आणि विकास विभागाचे माजी संचालक डॉ. एस. एस. व्ही. रामकुमार आणि रेणुका शुगर्सचे कार्यकारी संचालक रवी गुप्ता आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना शरद पवार म्हणाले की, साखर उद्योगामुळे ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांमध्ये चांगले रस्ते आणि सिंचन सुविधांद्वारे महत्वपूर्ण बदल घडवून आणले आहेत. आर्थिक व्यवस्था, वैद्यकीय सुविधा, वाहतूक आणि इतर अनेक सेवा क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यात साखर उद्योगाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. जगातील ८०% ऊर्जा संसाधनांचा समावेश असलेले जीवाश्म इंधन हे ग्लोबल वार्मिंगचे प्रमुख कारण आहे जे मानवजातीसाठी सर्वात मोठा धोका आहे. जगभरातील सरकारांनी हे एक आव्हान म्हणून स्वीकारले असले तरी त्यावरील उपायांबद्दल धोरण निश्चिती करणे आवश्यक आहे. भारत सरकारने देखील १९८० पासून यासंदर्भात अभियान सुरू केले होते आणि आताचे विद्यमान नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय अधिक ताकद आणि तत्परतेने आपली जबाबदारी पार पाडत आहे.'अन्न सुरक्षा' आणि 'ऊर्जा सुरक्षा' या दोन्ही गोष्टी हातात हात घालून कशा पुढे जातील, याविषयी खबरदारी घेणे आवश्यक आहे. भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा वीज उत्पादक आणि वीज ग्राहक देश आहे. सरकारने नवीन हायड्रोजन धोरण जाहीर केले असून त्यामध्ये २०२९-३० पर्यंतच्या पाच वर्षांच्या कालावधीसाठी १९७४४ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे.



### साखर उद्योगाचे योगदान महत्त्वपूर्ण

» साखर उद्योगामुळे ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांमध्ये चांगले रस्ते आणि सिंचन सुविधांद्वारे महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले आहेत. आर्थिक व्यवस्था, वैद्यकीय सुविधा, वाहतूक आणि इतर अनेक सेवा क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यात साखर उद्योगाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. जगातील ८०% ऊर्जा संसाधनांचा समावेश असलेले जीवाश्म इंधन हे ग्लोबल वार्मिंगचे प्रमुख कारण आहे जे मानवजातीसाठी सर्वात मोठा धोका आहे.

# पुणे रेल्वे स्थानकाला लवकरच पर्याय!

## हडपसर रेल्वे टर्मिनल उभारणीला गती




**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुणे रेल्वे स्थानकावरील प्रवाशांचा वाढता ताण कमी करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाकडून हडपसर टर्मिनलच्या विकासावर भर देण्यात आला आहे. या टर्मिनलसाठी एकूण १३५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, ३० टक्के काम पूर्ण झाले आहे. या टर्मिनलचे काम पूर्ण झाल्यानंतर अनेक लांब पल्ल्याच्या गाड्या या स्थानकावरून सुटणार आहेत. त्यामुळे पुणे रेल्वे स्थानकाला उपनगरी परिसरात पर्यायी स्थानक निर्माण होणार आहे.

सध्या हडपसर टर्मिनलवरील फलाट क्रमांक १, २ आणि ३ ची लांबी वाढविण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. याचबरोबर ११ कोटी ६९ लाख रुपयांच्या प्रवासी सुविधा उभारण्यात येत आहेत. यात सर्वसाधारण प्रतीक्षागृह, लाऊंज, ५ तिकिट आरक्षण केंद्रे, तिकिट चौकशी केंद्रे, फलाटांवर ८०० मीटर लांबीचे शेड, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सार्वजनिक उद्घोषणा व्यवस्था, प्रवाशांसाठी तीन विश्रांतीकक्ष, तिकिट तपासणीस कार्यालय आणि प्रसाधनगृह, सामान कार्यालय, पार्सल कार्यालय, रेल्वे सुरक्षा दल आणि लोहमार्ग पोलिसांसाठी कार्यालय, वीज उपकेंद्र इमारत, वाहनतळ, रस्त्यांचे रुंदीकरण ही कामे वेगाने सुरू आहेत. याचबरोबर सध्या असलेले कर्मचारी निवास पाडून त्याजागी स्थानक इमारत उभी राहत आहे. हडपसर टर्मिनलवर फलाटांची लांबी ६०० मीटरपर्यंत वाढविली जाणार आहे. त्यामुळे लांब पल्ल्याच्या गाड्या स्थानकावर थांबणे आणि सुटणे शक्य होणार आहे. सध्याची मालवाहतुकीच्या गाड्यांच्या मार्गाचे प्रवासी गाड्यांच्या मार्गात रुपांतर केले जाणार आहे. याचबरोबर स्थानकाची नवीन इमारत बांधली जाणार आहे. स्थानकाच्या आवारातील इतर सुविधांची उभारणी केली जाणार आहे. नवीन वाहनतळ आणि पाणी पुरवठ्यासाठी टाक्यांची उभारणी केली जाणार आहे.

> **“सध्या पुणे स्थानकावर नवीन गाड्या सुरू करण्यास मर्यादा आहेत. हडपसर रेल्वे टर्मिनल सुरू झाल्यानंतर तिथून अनेक लांब पल्ल्याच्या गाड्या सुरू होतील. प्रवाशांसाठी अतिरिक्त सुविधा निर्माण करण्याचा यामागे हेतू आहे.**
> **-डॉ.रामदास भिसे,**
> **जनसंपर्क अधिकारी, मध्य रेल्वे**

# गणेशोत्सवात बंदोबस्तासाठी सात हजार पोलीस!

## केंद्रीय सुरक्षा दलाच्या पाच तुकड्या; साध्या वेशातील पोलिसांची गस्त




**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** गणेशोत्सवात सात हजार पोलिसांचा कडक बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. संभाव्य घातपाती कारवाया, अनुचित घटना विचारात घेऊन पुणे पोलिसांनी बंदोबस्ताची आखणी केली आहे. वैभवशाली परंपरा असलेल्या गणेशोत्सवाचा प्रारंभ मंगळवारी (१९ सप्टेंबर) होणार आहे. उत्सवाच्या कालावधीत शहर, तसेच उपनगरात कडक बंदोबस्त राहणार आहे. पोलीस आयुक्त रितेश कुमार, सहपोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष शाखेचे उपायुक्त आर. राजा यांनी बंदोबस्ताची आखणी केली आहे.

उत्सवाच्या कालावधीत पुणे शहरात राज्यासह देशाच्या वेगवेगळ्या भागातून नागरिक दर्शनासाठी येतात. परदेशी नागरिक मोठ्या संख्येने पुण्यातील गणेशोत्सव पाहण्यासाठी येतात. उत्सवाच्या कालावधीत मध्यभागात होणारी गर्दी विचारात घेऊन पोलिसांनी बंदोबस्ताचे नियोजन केले आहे. भाविकांकडील मोबाइल चोरी, दागिने चोरी, तसेच अनुचित प्रकार रोखण्यासाठी साध्या वेशातील पोलीस बंदोबस्त तैनात केले जाणार आहेत. पोलीस आयुक्तालयातील पाच हजार पोलीस कर्मचारी, अधिकारी, शीघ्र कृती दल, गुन्हे शाखेची पथके, बाहेरगावाहून मागविण्यात आलेले एक हजार ३०० पोलीस कर्मचारी, एक हजार गृहरक्षक दलाचे जवान, केंद्रीय सुरक्षा दलाच्या पाच तुकड्या बंदोबस्तात राहणार आहे. बंदोबस्तास पोलीस मित्र सहाय्य करणार आहेत. उत्सवाच्या कालावधीत मानाच्या मंडळांसह गर्दीच्या ठिकाणची बॉम्ब शोधक नाशक पथकाकडून तपासणी केली जाणार आहे. पथकातील प्रशिक्षित श्वान, पोलीस कर्मचारी गर्दीच्या ठिकाणाची दिवसभरातून चार वेळा तपासणी करणार आहेत. उत्सवी गर्दीवर शहरातील १८०० सीसीटीव्ही कॅमेरे नजर ठेवणार आहे. पोलिसांनी मंडळांच्या कार्यकर्त्यांना मंडपाच्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या सूचना पोलिसांनी दिल्या आहेत. देशभरात घातपाती कारवाया करण्याच्या तयारीत असलेल्या दहशतवाद्यांना पुणे पोलिसांनी कोथरुड परिसरातून अटक केली. संभाव्य दहशतवादी हल्ला, घातपाती कारवाया विचारात घेऊन पोलिसांकडून उत्सवाच्या काळात कडक बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

### १८०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर

**» उत्सवी गर्दीवर शहरातील १८०० सीसीटीव्ही कॅमेरे नजर ठेवणार आहे. पोलिसांनी मंडळांच्या कार्यकर्त्यांना मंडपाच्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या सूचना पोलिसांनी दिल्या आहेत. देशभरात घातपाती कारवाया करण्याच्या तयारीत असलेल्या दहशतवाद्यांना पुणे पोलिसांनी कोथरुड परिसरातून अटक केली. संभाव्य दहशतवादी हल्ला, घातपाती कारवाया विचारात घेऊन पोलिसांकडून उत्सवाच्या काळात कडक बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.**

### साध्या वेशात पोलीस बंदोबस्त

**» वैभवशाली परंपरा असलेल्या गणेशोत्सवाचा प्रारंभ मंगळवारी (१९ सप्टेंबर) होणार आहे. उत्सवाच्या कालावधीत शहर, तसेच उपनगरात कडक बंदोबस्त राहणार आहे. पोलीस आयुक्त रितेश कुमार, सहपोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष शाखेचे उपायुक्त आर. राजा यांनी बंदोबस्ताची आखणी केली आहे. उत्सवाच्या कालावधीत पुणे शहरात राज्यासह देशाच्या वेगवेगळ्या भागातून नागरिक दर्शनासाठी येतात. परदेशी नागरिक मोठ्या संख्येने पुण्यातील गणेशोत्सव पाहण्यासाठी येतात. उत्सवाच्या कालावधीत मध्यभागात होणारी गर्दी विचारात घेऊन पोलिसांनी बंदोबस्ताचे नियोजन केले आहे. भाविकांकडील मोबाइल चोरी, दागिने चोरी, तसेच अनुचित प्रकार रोखण्यासाठी साध्या वेशातील पोलीस बंदोबस्त तैनात केले जाणार आहेत.**